REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# जागितीकीकरणाचे शेतीक्षेत्रावरील परिणाम

**डॉ.करकरे सी.पी.**
**सहयोगी प्राध्यापक**
**के.आर.एम. महिला महाविद्यालय, नांदेड.**

## प्रस्तावना

२१ व्या शतकाच्या उंबरठयावर भारत जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्ने पहात असतांनाच भारतातील शेतकरी व शेती व्यवसाय मात्र आर्थिक अरिष्टातून जात आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीला रॉयल कमिशनने भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती व कर्जबाजारीपणाबद्दल जे विधान केले होते, ते आज देखील जसेच्या तसे शेतकऱ्यांना लागू पडते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा आर्थीक विकास दर शेती विकासदरावर अवलंबून राहिल्याचे दिसून येते देशाचा सर्व साधारण आर्थिक विकासदर व शेती क्षेत्राचा विकास दर या दोघांमध्ये धनसंबंध दिसतो. त्यामुळे जेंव्हा जेंव्हा शेतीचा विकासदर जास्त राहीला तेंव्हा तेंव्हा भारताचा विकासदर ही जास्त राहीलेला दिसून येतो. या वरुन भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व दिसून येते. आज देखील भारताच्या एकूण लोकसंख्ये पैकी ६५ टक्के लोकसंख्या व ५० टक्के कामगार उपजिवीकेसाठी शेतीवर अंवलंबून आहेत. स्वातंत्र्योतर काळात शेतीवर अवंलूबन असणारी लोकसंख्या २.५ पटीने वाढली अन्न धान्याचे उत्पादन ५ पटीने दुधाचे उत्पादन ६ पटीने, मच्छ उत्पादन ९ पटीने वाढले. पण देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनातील शेतीचा वाटा ५७ टक्यावरुन १४ टक्के इतका कमी झाला.

शेती बिनकिफायतशीर बनल्यामुळे १९९१ ते २००१ या काळात ८० लाख शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले तर एनएसएसओ-२००५ अहवाल यांचा सर्वेनुसार पर्यायी रोजगार उपलब्ध करुन दिल्यास ४०.१ टक्के शेतकऱ्यांने शेती व्यवसाय सोडून देण्यास तयार असल्याचे सांगीतले. जुलै १९९१ मध्ये भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. जागतिकीकरणाच्या काळात विकासाची प्रक्रीया मंदावली व शेतकरी कर्जाच्या सापळयात अडकून आत्महत्यासारखे शस्त्र अवलंबायला लागले. जागतिक स्पर्धा शेतकी अनुदाने, पेटंटची बियाणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रातील प्रवेश, भांडवलदारी शेती पध्दती, राज्य व केंद्र सरकारची शेती विषयक सदोष धोरणे याच जोडीला नैसर्गिक आपत्ती, अपुरा कर्जपुरवठा, सदोष शेतमाल बाजार व्यवस्था, खाजगी सावकारी अशी आव्हाणे शेती क्षेत्रात निर्माण झाल्यामुळे शेती बिन किफायतशीर बनली.

## शोध निबंधाची उद्दिष्टे :-

१. भारतीय शेती क्षेत्रावरील जागतिकीकरणाचा झालेला परिणाम अभ्यासणे.
२. भारतीय शेती क्षेत्रात जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने अभ्यासणे.

## संशोधणाची पध्दती :-

प्रस्तुत अध्ययन दुय्यम सामग्रीवर आधारलेले आहे. वेगवेगळे रिपोट्स, अनेक वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल व विविध सांकेतस्थळावरुन प्रकाशीत अहवालातून घेतलेले आहे.



## जागतिकीकरण व भारतीय शेती :-

जागतिकीकरणामुळे भारताच्या कृषी क्षेत्रावर अनेक बाबतीत प्रतिकुल परिणाम घडवून आला आहे. भारतीय शेतमाल निर्यातीला आंतरराष्ट्रीय बाजारात तीव्र स्वरुपाची स्पर्धा निर्माण झाली आहे. विकसीत देश आपल्या शेतमालाला प्रचंड अनुदान देत आहेत. या अनुदानाचे प्रमाण किमान ४४ टक्के व कमान ७०० टक्यांपेक्षा जास्त आहे. या उलट भारतात फक्त वस्तुविरहीत अनुदानाचे प्रमाण ४ टक्के इतके आहे. तर कांही वस्तुच्या बाबतीत उणे स्वरुपाचे आहे. भारत सरकारने खते, सिंचन, अवजारे यावरील अनुदाने कमी केली आहेत.

विकसीत देशांनी भारतासारख्या विकसन शील देशांचा शेत माल आपल्या बाजारात येऊ नये म्हणून आयातकर मोठया प्रमाणात लादले आहे. ते कमी करण्यास तयार नाहीत. डब्ल्यूटीओ च्या बैठकीत अमेरिका व इतर ३० शेतमाल निर्यातदार देश आपला दबावगट निर्माण करुन विकसनशील देशांनी शेतमालाच्या आयातीवरील कर व अनुदाने कमी करावी म्हणून दबाव आणतात तसेच हे देश भारतांने शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमती देऊ नयेत, अन्न सुरक्षा कार्यक्रम राबवू नये, शेती अनुदाने देण्यास विरोध करतात. हे चित्र २०१५ च्या नैरोबी व २०१७-१८ च्या ब्युनॉस आयर्स परिषदेत दिसून आले. परिणामी, भारताची निर्यात कमी राहून, देशात शेतमालाच्या किमती कमी राहतात व शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. २५ जुलै , २००७ चा अमेरिकेतील कापसावरील अनुदानाबाबत न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो, अमेरिकेत कापसाला मिळणाऱ्या प्रचंड अनुदानामुळे जागतिक बाजारपेठेत कापसाची मोठी आवक वाढली असून गरीब देशांतील शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड झाले आहे. विकसित देशांतील आयात कराचे प्रमाण किमान ८२ टक्के व कमाल ३८८ टक्के आहे. याउलट, भारताने कापसावरील आयात कर ३५ टक्क्यांवरुन ५ टक्के असा कमी केला. याचा परिणाम, भारतात परदेशी कापसाची आयात वाढून कापसाच्या किमती कमी झ ाल्या. याउलट, भारतात केंद्र सरकारने कांदा, साखर वगैरे शेतमालावर निर्यात शुल्क लादले. त्यांच्या आयातीवरील बंधने उठविली. परिणामी तूर, सोयाबीन, साखर, कांदा वगैरे शेतमालाच्या किमती पडल्या व शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

अमेरिका व इतर विकसित देशांच्या शेतीमाल धोरणाबाबत नोबेल पारितोषिक विजेते 'जोसेफ स्टिगलिटझ्' म्हणतात, "विकसनशील देशांनी अमेरिका जोपर्यंत त्यांच्या शेतकऱ्यांची अनुदाने बंद करीत नाही, तोपर्यंत अमेरिकन कृषिमालास मुळीच प्रवेश देऊ नये." जागतिकीकरणामुळे पेटंट कायद्याची अंमलबजावणी केली जात असल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे बियाणे उत्पादक बहुराष्ट्रीय कंपन्यावरील अवलंबित्व वाढले आहे. यालाच जी.एम. बियाणे म्हणतात. अनेक वेळा या बियाणांची उगवण न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सन २०१७-१८ मध्ये या कंपन्यांच्या कापसाच्या बीटी बियाणांपासून निर्मित कापसावर बोंड अळी पडली व या कंपन्यांचा बिटी बियाणे कीड प्रतिबंधक व बोंड अळी प्रतिरोधक आहेत. हा दावा फोल ठरला. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत या कंपन्यांनी हात वर केले आहेत, असाच अनुभव जागतिकीकरणाद्वारे सुरु झालेल्या करार शेतीबाबत आला आहे. करारशेतीतील शेतमाल खरेदीचा करार बहुराष्ट्रीय कंपन्यांची न पाळल्यामुळे पंजाब व हरियाणातील बटाटे व टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले पाहायला मिळाले.

## शेतकऱ्यांच्या आर्थीक हालाखीची कारणे :-

भारतीय शेती क्षेत्राच्या हलाखीस केंद्र व राज्य सरकारची आर्थिक धोरणे देखील कारणीभूत ठरली. १९९१ ते २०११ या काळात शेती क्षेत्रावर अंदाजपत्रकात फक्त ४.४ टक्के खर्च करण्यात आला. भारताच्या शेतकी खर्च व किंमत आयोगाची किमान आधारभूत किंमत निश्चीतीची प्रक्रीयाच सदोष आहे. देशांच्या विविध पिंकाच्या किमान आधारभूत किंमती ठरवितांना हा आयोग देशातील २८ राज्य व २ केंद्रशासीत प्रदेशातील पिंकाचा सरासरी उत्पादन खर्च ग्रहीत धरुन किमान आधारभूत किंमती ठरवितो त्यामुळे या किंमती उत्पादन खर्चापेक्षा किती तरी कमी राहतात.

जागतीक हवामान बदलाचा भारतीय शेती क्षेत्रात प्रतिकुल परिणाम दिसून येतो. पृथ्वीवरील तापमान ०.१८ से.ग्रेडने वाढले आहे. या तापमान वाढीमुळे जमिनीची शुष्कता वाढते, पर्जन्यमानात वाढ किंवा घट होते त्यामुळे चक्रीवादळे, पुर, दुष्काळ, पिकांवर रोगराई व कीड पडते परिणामी, पिकांचे उत्पादन घटून शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होते. भारतात हवामान बदल व तापमानवाढीमुळे गहू, तांदूळ इतर अन्न वर्गीय पिकांच्या उत्पादनात घट होत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील जोखीम व अस्थिरता वाढते नैसर्गीक धोके निर्माण होऊन शेती उत्पादनात घट दिसते त्यामुळे शेतकरी आर्थीक दृष्टया कमकुवत राहतो. शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज पुरवठा उपलब्ध होत नाही.

## शेतकऱ्यांची दुरवस्था संपविण्यासाठी उपाय योजना :-

शेतीची आणि शेतकऱ्यांची दुरावस्था संपविण्यासाठी आधार किंमत हा रामबाण उपाय आहे असे समजले जाते. तर दुसरा उपाय घटक अनुदान देणे. यामध्ये शेतमालाला आधारभुत किंमत न देता शेतकरी वापरत असलेल्या उत्पादन घटकावर आधारीत अनुदान देऊन खर्च कमी करण्यात येतो तर घटकावर अनुदान न देता ते आनुदान शेतकऱ्यांला दयावे शेतकरी तो पैसा आपल्या निर्णयाप्रमणो खर्च करु शकेल हा उपाय तेलंगणा राज्य सरकारने राबविण्यास सुरुवात केली आहे.

लागवडीच्या प्रारंभीच, कोणते पीक घ्यावे, यासंबंधी शेतकऱ्याला तज्ञांचे मार्गदर्शन व्हावे, शेतकऱ्यांला लागवडीच्या काळातील विशिष्ट परिस्थीती, पर्जन्यमान, याबरोबर शेतकऱ्याची वेगळी आर्थीक क्षमता, मनुष्यबळासंबंधीची वेगळी स्थिती, त्याच्या मर्यादा, त्याची मानसिकता या सगळयांचा विचार करुन व्यक्तिगत मार्गदर्शन स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी. भारत सरकारने स्वामीनाथ आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी केल्यास शेतकऱ्यांची आर्थीक परिस्थिती सुधारु शकते.

१. कृषी पतपुरवठा प्रणालीचा विस्तार करावा.
२. पीक कर्जावरील व्याजदर कमी करावा.

३. संकटकालीन नैसर्गिक व अन्य परिस्थतीमध्ये कृषी कर्जासह अन्य सर्व कर्जांची वसुली स्थगित ठेवावी. परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत त्याच्यावरील व्याजही माफ करावे.
४. पीक विमा योजनेचा विस्तार करुन सर्व पिकांना कमीत कमी हप्त्यावर विमा संरक्षण द्यावे, त्यासाठी ग्रामीण विमा विकास निधी ची स्थापना करावी.
५. पीक नुकसानीचे मूल्यमापन करताना ब्लॉक च्या ऐवजी गाव हा घटक वापरुन विमा संरक्षण द्यावे.
६. सामाजिक सुरक्षा यंत्रणेचे जाळे निर्माण करुन, त्या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी स्वास्थ विमा आणि वृध्दावस्थेतील आधार यासाठी तरतूद करावी.
७. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देऊन त्यांच्याकडून शेतीपूरक पर्यावरण आणि जीवसंस्थांचे जतन आणि संवर्धन करावे.
८. शेती खरेदी करताना कोण, कशासाठी आणि किती जमीन खरेदी करतोय याचे नियमन करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी.
९. परवडणाऱ्या दरात बी-बियाणे व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करुन द्यावी.
१०. कमी जोखमीचे आणि कमी किमतीचे तंत्रज्ञान पुरविण्यात यावे. जेणेकरुन पीक हातचे गेले तरी होणारा तोटा मर्यादीत राहील.

**निष्कर्ष :**

शेतीसुधारण्यासाठी स्वस्त दराने कर्ज पुरवठा करावा. शेतीसाठी विजपुरवठयाचा दर कमी करावा व शेती आणि ग्रामीण भागासाठी २४ तास विजेची सोय उपलब्ध करावी.

दुष्काळामुळे किंवा अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करुन भरपाई देणे. शेतमालाला हमीभाव उत्पादन खर्चावर आधारीत देणे. आंतरराष्ट्रीय बाजारातील शेतमाल किंमतीच्या शेतकऱ्याचे संरक्षण करण्यासाठी इतर देशातून येणाऱ्या शेतमालावर आयातकर आकारावा.

**संदर्भ सुची :**

1. भारतीय अर्थ व्यवस्था, रुद्र दत्त सुंदरम.
2. भारतीय अर्थ व्यवस्था रंजन कोळंबे.
3. Economic survey of India 2005-06 to 2017-18.
4. NSSO-Report 2007.
5. Report of the National commission on farmers 2006.
6. Indian Express dt.15-12-18 Agri income support Telngana.
7. Damodaran Harish, Swaminathan Formula mirage in Indian Express dt. 22-6-17.
8. Aiyar S.S.: Don't Let it come a Cropper, Eco. Times, Dated 13-2-2018.
9. Gulati Ashok : How to Help Farmers, in Indian Express Date 29-1-18 .



**डॉ.करकरे सी.पी.**
**सहयोगी प्राध्यापक**
**के.आर.एम. महिला महाविद्यालय, नांदेड.**